

गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



* वर्ष ६५ वे * अंक २५४ * नांदेड * बुधवार, दि. २३ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

औरंगाबाद पदवीधरसह महाराष्ट्र विधान परिषदेच्या ५ जागांसाठी २३ ऑक्टोबरला निवडणूक

पदवीधर व शिक्षक मतदारसंघातील निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

मुंबई (प्रतिनिधी)– भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेतील पदवीधर व शिक्षक मतदारसंघातील पाच जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार औरंगाबाद विभाग पदवीधर, पुणे विभाग पदवीधर, नागपूर विभाग पदवीधर, अमरावती विभाग शिक्षक आणि पुणे विभाग शिक्षक या पाच मतदारसंघांसाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी संपुष्टात येणार आहे.

या निवडणुकीसाठी २९ सप्टेंबर २०२६ रोजी अधिसूचना प्रसिद्ध होईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ६ ऑक्टोबर, अर्जांची छाननी ७ ऑक्टोबर, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची



अंतिम तारीख ९ ऑक्टोबर २०२६ आहे. मतदान २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत होईल. मतमोजणी २७ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात येणार असून, निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबर २०२६ पूर्वी पूर्ण केली जाणार आहे.

महाराष्ट्रातील या पाच जागांमध्ये औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघातून सतीश चव्हाण, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघातून अरुण लाड, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून अभिजीत वंजारी, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून किरण सरनाईक आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून जयंत आसगावकर या विद्यमान सदस्यांचा समावेश आहे.

भारत निवडणूक आयोगाने या निवडणुकांची घोषणा केल्यापासून संबंधित मतदारसंघांमध्ये आदर्श आचारसंहिता तत्काळ लागू झाली आहे. पदवीधर व शिक्षक मतदारसंघांसह विधान परिषद निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहितेच्या तरतुदी लागू करण्याबाबत आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांमध्येही स्पष्टता देण्यात आली असल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

भारतीय महिला क्रिकेट संघाला आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक

मुंबई (प्रतिनिधी)– भारतीय महिला क्रिकेट संघाने२०२६च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्णपदकावर नाव कोरले आहे. भारत महिला क्रिकेट संघने अंतिम सामन्यात श्रीलंका महिला क्रिकेट संघचा तब्बल १४७ धावांनी पराभव करत सुवर्णपदक पटकावले. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारताने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत २१६ धावांचा डोंगर उभा केला. प्रत्युत्तरात श्रीलंकेचा डाव अवघ्या ६९ धावांत आटोपला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय भारताने घेतला. सलामीला आलेल्या शेफाली वर्मा आणि स्मृती मानधना यांनी भारताला आक्रमक सुरुवात करून दिली. दोघींनी पहिल्या विकेटसाठी तब्बल ९९ धावांची भागीदारी केली. शेफाली वर्मा अर्धशतकापासून अवघ्या दोन धावा दूर राहिली. तिने २९ चेंडूंत ४८ धावा करताना तीन षटकार आणि तीन चौकार लगावले. यानंतर स्मृती मानधनाने डावाची सूत्रे हाती घेतली. तिने ४५ चेंडूंत ७९ धावांची शानदार खेळी केली. तिच्या खेळीत सात षटकार आणि पाच चौकारांचा समावेश होता. या खेळीदरम्यान मंधानाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ११ हजार धावांचा टप्पा पार केला. हा पराक्रम करणारी ती पहिली महिला क्रिकेटपटू ठरली.

स्मृती मानधना १६.५ षटकांत १६३ धावांवर बाद झाली. त्यामुळे भारताला २०० धावांचा टप्पा गाठणे कठीण वाटत होते. मात्र, रिचा घोषने अखेरच्या षटकांमध्ये तुफानी फलंदाजी करत सामन्याचे चित्रच बदलले. रिचाने अवघ्या २२ चेंडूंत नाबाद ४९ धावा केल्या. तिच्या खेळीत तीन षटकार आणि सहा चौकारांचा समावेश होता. भारताने अखेरच्या षटकात तब्बल २५ धावा ठोकल्या आणि निर्धारित २० षटकांत २१६ धावांपर्यंत मजल मारली.

नांदेडमध्ये गणेश विसर्जनाचा पेच : गोदावरी कोरडी, खदानी रिकाम्या; तीन हजार मूर्ती विसर्जित करणार कुठे?

नांदेड (प्रतिनिधी)– शहरात गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला असताना प्रशासन आणि गणेश मंडळांसमोर विसर्जनाचा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे. यंदा पाऊस नसल्याने गोदावरी नदी कोरडीठाक पडली असून, शहरातील विसर्जनासाठी असलेल्या खदानीही रिकाम्या आहेत. दोन दिवसांवर विसर्जन येऊन ठेपले असताना मूर्ती विसर्जित करायच्या कुठे, असा प्रश्न सर्वांनाच पडला आहे.

नांदेड शहरात यंदा १५ ते २० फूट उंचीच्या भव्य गणेश मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. लहान-मोठ्या मिळून शहरात तीन हजारांहून अधिक मूर्ती आहेत. दरवर्षी या मूर्तींचे विसर्जन गोदावरी नदीत आणि विष्णुपुरी, आसना, झरी, पुयनी आणि सांगवी बायपास आसना परिसरातील खदानींमध्ये केले जाते. मात्र यंदा पावसाने दडी मारल्याने गोदावरी पात्रात पाणीच नाही, तर खदानींमध्येही केवळ चिखल उरला आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने शहराच्या आजूबाजूला असलेल्या अर्धापूर तालुक्यातील येळेगाव साखर कारखाना खदानी तसेच उस्माननगर रस्त्यावर काही मुरूम खोदल्यामुळे तयार झालेल्या खदानी व तलावांची पाहणी सुरू केली आहे. पाणी असलेले पर्यायी विसर्जन स्थळ शोधण्याचा प्रयत्न सुरू असला तरी १५- २० फूट उंचीच्या मूर्तींसाठी पुरेसे पाणी असलेले ठिकाण सापडत नसल्याने प्रशासनाची अडचण वाढली आहे.

विसर्जनाला अवघे दोन दिवस उरले असताना अद्याप ठोस निर्णय न झाल्याने गणेश मंडळांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. प्रशासनाने तात्काळ पर्यायी व्यवस्था करून कृत्रिम विसर्जन कुंड उभारावेत आणि पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी भाविकांमधून होत आहे. अन्यथा विसर्जनाच्या दिवशी मोठा गोंधळ उडण्याची शक्यता आहे.

नांदेड जिल्ह्यात कापूस खरेदीसाठी 'कपास किसान' ॲपवर नोंदणी सुरू

सीसीआयमार्फत मिळणार ७ टक्के वाढीव हमीभाव

अर्धापूर (प्रतिनिधी)– नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील सर्व कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची सूचना आहे. आगामी कापूस हंगाम २०२६-२७ करिता भारतीय कपास निगम लि. सीसीआयमार्फत किमान आधारभूत किंमत एम.एस.पी.अंतर्गत लवकरच कापूस खरेदी सुरू करण्यात येणार आहे. केंद्र सरकारने चालू हंगामासाठी कापसाच्या किमान आधारभूत किंमतीत सुमारे ७ टक्के वाढ केली आहे.

कापूस विक्रीसाठी इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी दि. १ सप्टेंबर २०२६ पासून 'कपास किसान' या मोबाईल ॲपवर नोंदणी सुरू करण्यात आली असून, दि.३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत स्वतःच्या मोबाईलवरून स्वतःचे रजिस्ट्रेशन करणे बंधनकारक आहे. तरी सर्व कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी या सूचनांची नोंद घेऊन दि. ३१ ऑक्टोबर २०२६ पूर्वी आपली



नोंदणी करून घ्यावी. शेतकऱ्यांना नोंदणीसाठी मदत हवी असल्यास शेतकऱ्यांनी शेतकरी व्हाट्सअप हेल्पलाईन ७४९९३ ९६६२४ वर किंवा कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेड कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन सभापती संजय देशमुख लहानकर, उपसभापती भुजंग पाटील, बाजार समितीचे सचिव गणेश भारसावडे व संचालक मंडळाने केले आहे.



नांदेड– गणेश विसर्जन ठिकाणांची आमदार बालाजीराव कल्याणकर, महापालिका अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने, पोलीस निरीक्षक संतोष तांबे, मनपाचे टाकळीकर आणि नगरसेवक संदीपसिंघ गाडीवाले आर्दीनी पाहणी केली. त्याप्रसंगीचे छायाचित्र.

१६ कोटींच्या घोटाळा प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी नेमली चौकशी समिती

किनवट (प्रतिनिधी)– किनवटच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात झालेल्या तब्बल १६ कोटी ३७ लाख ६६ हजार ९९२ रुपयांच्या कथित घोटाळा हा प्रशासकीय कार्यक्षमतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे. दरम्यान, या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.राहुल कर्डिले यांनी चार सदस्यीय समिती नेमली आहे. स्थानिक आ.भीमराव केराम यांनी या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

किनवटच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाला महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून अनुसूचित जमातीच्या घटकांसाठी विकासात्मक, शैक्षणिक आणि कल्याणकारी योजना राबविण्यासाठी कोट्यवधींचा निधी उपलब्ध होतो. प्राप्त निधीचा उचित विनियोग होण्यासाठी शासनाने आयएएस अधिकाऱ्याची या कार्यालयात प्रकल्प अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. किनवटच्या आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या सन दि.१ एप्रिल २०२४ ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत प्राप्त केंद्रीय अखर्चिक योजनांच्या तब्बल १६ कोटींहून अधिक रकमेचा अपहार झाला आहे. दि.२६ फेब्रुवारी २०२४ रोजी या कार्यालयाचे प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी म्हणून मेघना कावली यांनी,तर त्यानंतर जेनिथ चंद्रा दोन्तुला यांनी वरील पदभार सांभाळला होता. रोखपाल तथा वरिष्ठ लिपीक म्हणून भगवान डवरे हे सन २०२१ पासून कार्यरत आहेत. कोट्यवधींच्या निधीचा योग्यरित्या विनियोग होत आहे, की नाही, ही बाब वरील दोन भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या नजरेत आली नाही ? तब्बल २९ महिन्यांच्या कालखंडात तत्कालीन अधिकाऱ्यांनी

रोखपालाकडील बँकेचे विवरण पत्र,कार्यालयातील रोखवही,धनादेश नोंदवहीची पडताळणी केली नाही का ? शिवाय, सन २०२४ मध्ये नागपूरच्या महालेखाकार कार्यालयाकडून झालेल्या लेखापरीक्षणातही ही अफरातफर उघडकीस आली नाही, हे विशेष. दरम्यान, नांदेडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची प्रशासकीय पातळीवरही चौकशी करण्यासाठी चार सदस्यीय समिती स्थापन केली आहे. त्यामुळे पोलिस तपासासोबतच समितीच्या चौकशीतूनही या प्रकरणातील वस्तुस्थिती समोर येण्याची शक्यता आहे. याबाबत प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी बी. सरवणन यांनी माहिती देताना संबंधित प्रकरणाची चौकशी सुरू असल्याचे सांगितले. त्यामुळे चौकशीअंती गैरव्यवहाराची व्याप्ती आणि त्यामध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींची भूमिका स्पष्ट होणार आहे. महाघोटाळ्याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यापासून मुख्य सूत्रधार तथा रोखपाल भगवान डवरे 'नॉट रिचेबल' असून, त्याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

नांदेडमध्ये भरबाजारात चाकू हल्ला करून मोबाईल हिसकावला

नांदेड (प्रतिनिधी)– शहराच्या गजबजलेल्या वजिराबाद परिसरात भरबाजारात चाकूने हल्ला करून मोबाईल हिसकावण्याची घटना घडली आहे.

दि. २० सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता रेल्वे स्टेशन तांडा बार समोर, नांदेड येथे अज्ञात आरोपीने फिर्यादी रत्नमाला शिवाजी गायकवाड यांच्या पतीजवळील मोबाईल हिसकावण्याचा प्रयत्न केला. पतीने प्रतिकार करताच आरोपीने त्यांच्या पोटावर चाकूने वार करून जखमी केले आणि पळ काढला. या प्रकरणी वरिजाबाद ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य वैद्यकीय परिषदेच्या अध्यक्षपदी डॉ. संजय कदम यांची बिनविरोध निवड

नांदेडच्या वैद्यकीय क्षेत्रात आणखी एक मानाचा तुरा

नांदेड/मुंबई (प्रतिनिधी)– महाराष्ट्र राज्य वैद्यकीय परिषदेच्या अध्यक्षपदी नांदेडचे प्रसिद्ध प्लास्टिक सर्जन तथा आधार हॉस्पिटलचे संचालक डॉ. संजय कदम यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. त्यामुळे नांदेडच्या वैद्यकीय क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

महाराष्ट्र राज्य वैद्यकीय परिषदेच्या निवडणुकीत आयएमए पॅनेलतर्फे निवडणूक लढवत सलग दोन वेळा राज्यात सर्वाधिक मतांनी विजयी झाल्यानंतर डॉ. संजय कदम यांची मुंबई येथील महाराष्ट्र राज्य वैद्यकीय परिषद कार्यालयात अध्यक्षपदासाठी नामनिर्देशन प्रक्रिया पार पडली.

राज्य शासनाच्यावतीने नामनिर्देशित नऊ सदस्य आणि प्रत्यक्ष निवडणुकीतून निवडून आलेले नऊ सदस्य असे एकूण १८ सदस्यांना मतदानाचा अधिकार होता. त्यापैकी १७ सदस्य प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेस उपस्थित होते. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत उपस्थित सर्व १७ सदस्यांनी डॉ. संजय कदम यांच्या बाजूने मतदान केले. त्यामुळे १७ पैकी १७ मते मिळवत त्यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड घोषित करण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून संदीप ढाकणे, उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, मंत्रालय तसेच डॉ. सुवर्णा खरात, सहसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी जबाबदारी सांभाळली. परिषदेच्या घटनेतील तरतुदीनुसार अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच सहा कार्यकारी सदस्यांची निवड करण्यात आली.


डॉ. संजय कदम यांच्या बिनविरोध निवडीमुळे नांदेड जिल्ह्याला महाराष्ट्र राज्य वैद्यकीय परिषदेच्या सर्वोच्च पदावर प्रतिनिधित्व मिळाले असून, त्यांच्या निवडीबद्दल वैद्यकीय क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

यावेळी नांदेडवरून मुंबईला खास करून शुभेच्छा देण्यासाठी डॉ. विजय डोंगरे, डॉ. आशा विजय डोंगरे, श्याम पाटील वडजे, डॉ. अथर्व शिंदे, विदित डोंगरे आणि भगवान मुंगल हे प्रत्यक्ष उपस्थित राहून त्यांच्या निवडीबद्दल शुभेच्छा दिल्या.



नवनिर्वाचित पदाधिकारी व कार्यकारी सदस्य

अध्यक्ष : डॉ. संजय कदम, नांदेड
उपाध्यक्ष : डॉ. राहुल कुलकर्णी, ठाणे
कार्यकारी सदस्य : डॉ. अनिल पाटील, जळगाव
कार्यकारी सदस्य : डॉ. सुनील इंगळे, पुणे
कार्यकारी सदस्य : डॉ. संजय देशपांडे, नागपूर
कार्यकारी सदस्य : डॉ. प्रशांत चौधरी, पुणे
कार्यकारी सदस्य : डॉ. उज्वला दहिफळे, छत्रपती संभाजीनगर
कार्यकारी सदस्य : डॉ. चंद्रशेखर गिल्लुरकर, नागपूर



अवैध धंद्यांवर नांदेड परिक्षेत्रात कारवाई; ३ आठवड्यात १२२२ गुन्हे, १५ कोटींचा मुद्देमाल जप्त

नांदेड (प्रतिनिधी)– पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड परिक्षेत्रात सुरू असलेल्या 'अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम-३' अंतर्गत मोठी कारवाई करण्यात आली आहे. १ ते २१ सप्टेंबर या तीन आठवड्यांच्या काळात परिक्षेत्रात गुटखा, मटका-जुगार, अवैध दारू विक्री आणि शस्त्र अधिनियमांतर्गत एकूण १२२२ गुन्हे दाखल करून १९८२ जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत १५ कोटी ५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

यामध्ये गुटखा बंदीविरोधात ३९ गुन्हे दाखल करून १.२१ कोटींचा मुद्देमाल जप्त केला आहे. मटका-जुगारांविरोधात २०४ गुन्हे दाखल करून १.८३ कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अवैध दारूविक्रीविरोधात ७४६ गुन्हे दाखल करून ३५.२४ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शस्त्र अधिनियमाप्रकरणी २८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यासह इतर प्रकरणी २२२ गुन्हे दाखल करून ११.६३ कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या मोहिमेत परभणीच्या जिंतूर येथील दोस्ती मित्र मंडळ चॅरिटेबल ट्रस्ट क्लब, हिंगोलीच्या वसमत येथील भट्टी गल्लीतील जुगार अड्डा आणि नांदेडच्या इतवारा पोलीस ठाणे हद्दीतील गुटख्यावरील कारवाईचा समावेश आहे.

दरम्यान, अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना देता यावी यासाठी ९१ ५० १०० १०० हा 'खबर' हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आला आहे. नागरिकांनी आपल्या भागातील अवैध धंद्यांची माहिती या क्रमांकावर फोन करून किंवा व्हॉट्सॲपद्वारे द्यावी, असे आवाहन डीआयजी शहाजी उमाप यांनी केले आहे.

बौद्ध महिलांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य भोवले; माजी मंत्री लक्ष्मण ढोबळेंविरुद्ध गुन्हा दाखल

अंजली गायकवाड यांच्या पाठपुराव्याला यश

नांदेड (प्रतिनिधी)– आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी १३ सप्टेंबर रोजी नांदेड येथे आयोजित मोर्चादरम्यान बौद्ध समाजातील महिला व मुलींबाबत कथित आक्षेपार्ह वक्तव्य करण्यात आले होते. याप्रकरणी माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे यांच्याविरुद्ध वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माजी नगरसेविका अंजली गायकवाड यांनी या प्रकरणी सातत्याने पाठपुरावा करून पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती. त्यांच्या पाठपुराव्यालाच हे यश आल्याचे मानले जात आहे.

तक्रारीनुसार, मोर्चादरम्यान बौद्ध महिलांविषयी अपमानास्पद आणि जातीय स्वरूपाची भाषा वापरण्यात आली. यामुळे महिलांच्या भावना दुखावल्या असून मानसिक त्रास आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणात उपलब्ध व्हिडिओ रेकॉर्डिंगच्या आधारे चौकशी करावी आणि संपूर्ण भाषणाचे प्रतिलेखन करून मूळ ध्वनिचित्रफिती तपासावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली होती. मंचावरील इतर व्यक्तींच्या भूमिकेचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

हा गुन्हा दाखल करण्यासाठी अंजली गायकवाड, प्रा. देविदास मनोहरे, पी.एस. गवळे, जे.डी. कवडे, नंदकुमार बनसोडे, ॲड. के.टी. चावरे, विमल पंडित, बबिता पोटफोडे, सविता मांजरमकर, विमल किर्तने, प्रशिक गायकवाड आदींनी वजिराबाद पोलीस ठाण्यात ठाण मांडले होते. अखेर मनमाड येथील अरुणा गौतम जाधव यांच्या फिर्यादीवरून माजी मंत्री लक्ष्मण ढोबळेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.